# इ.११ वी केंद्रीय प्रवेश प्रक्रिया २०१५-१६

## प्रसिध्दीपत्रक

पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील सर्व उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता ११ वी चे प्रवेश ऑनलाईन पध्दतीने करण्यात येणार आहेत. सदर प्रवेशासंदर्भात आज दि.०२.०५.२०१५ रोजी आबासाहेब गरवारे महाविद्यालयामध्ये केंद्रीय प्रवेश समितीची बैठक झाली. सदर बैठकीमध्ये सन २०१४-१५ मधील प्रवेशाचा आढावा घेऊन पुढील शैक्षणिक वर्षासाठी समितीच्या ठरावानुसार निर्णय घेण्यात आला.

सन २०१५-१६ मध्ये विद्यार्थ्यांना कनिष्ठ महाविद्यालयांचे पसंतीक्रम भरताना एकुण ५० एवढे आपल्या पसंतीचे पसंतीक्रम उतरत्या क्रमाने भरता येणार असून प्रथम ४० पसंतीक्रम भरणे अनिवार्य राहील. कला इंग्रजी माध्यमाच्या शाखेकरीता कनिष्ठ महाविद्यालयांची संख्या कमी असल्याने उपलब्ध सर्व प्राधान्यक्रम भरावे लागतील असा बदल करण्यात आला आहे.

प्रवेशासंदर्भातील माहिती पुस्तिका तयार करण्याचे काम चालू असून पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील पुणे शहर या विभागासाठी नूतन मराठी विद्यालय (नूमवी) मुलांचे, बुधवार पेठ, पुणे व पुणे पूर्व विभागासाी कॅम्प एज्युकेशन सोसायटीचे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, बाबाजान चौक, कॅम्प, पुणे-१ आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रासाठी गोदावरी हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, चिंचवड या तीन केंद्रांवर विभागातील संबंधित माध्यमिक शाळांनी आपल्या शाळेतील इ.१० वी मार्च २०१५ परिक्षा प्रविष्ट विद्यार्थीसंख्येएवढी माहिती पुस्तिकेची मागणी नोंद सदर शाळांमार्फत करावयाची आहे. माहिती पुस्तिका सर्व माध्यमिक शाळांना वरील तीन केंद्रांवरून केलेल्या नोंदणीप्रमाणे वितरीत करण्यात येतील. मुख्याध्यापकांनी माहितीपुस्तिका उपलब्ध झाल्यानंतर विद्यार्थ्यांना शाळेमार्फत देण्याची व्यवस्था करून विद्यार्थ्यांचे ऑनलाईन प्रवेश अर्ज आपल्या शाळेमधून भरून घ्यावयाची आहे. असे अर्ज भरताना विद्यार्थ्यांची विशेष व सामाजिक आरक्षणाबाबतची कागदपत्रे मुख्याध्यापकांनी तपासून सदर अर्ज 'अप्रूव्ह' करून प्रवेश अर्जाची एक प्रत विद्यार्थ्यांना दयावयाची आहे.

सीबीएसई, आयसीएसई, आयबी, एनआयओएस व अन्य बोर्डाच्या तसेच पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राबाहेरील विद्यार्थ्यांसाठी माहिती पुस्तिकेचे वाटप पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्रातील एकुण नऊ झोन केंद्रांवरून म्हणजेच १. स.प.महाविद्यालय, २. आबासाहेब गरवारे महाविद्यालय, ३. शाहू मंदिर महाविद्यालय, ४. वसंतराव सणस विद्यालय, वडगांव खुर्द, ५.नौरोसजी वाडिया महाविद्यालय, ६.आकुताई कल्याणी साधना विद्यालय, हडपसर, ७.फर्ग्युसन महाविद्यालय, ८.जयहिंद महाविद्यालय, पिंपरी, ९. म्हाळसाकांत विद्यालय, आकुर्डी या ठिकाणी करण्यात येईल.

सदर बैठकीसाठी श्री रामचंद्र जाधव, शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे तथा अध्यक्ष, इ.११ वी केंद्रीय प्रवेश समिती, पुणे, श्री बाळासाहेब ओव्हाळ, सहाय्यक शिक्षण संचालक, पुणे विभाग, पुणे तथा सचिव, इ.११ वी केंद्रीय प्रवेश समिती, पुणे, डॉ.श्रीकांत गुप्ता, प्राचार्य, आबासाहेब गरवारे महाविद्यालय, पुणे तथा कार्याध्यक्ष, इ.११ वी केंद्रीय प्रवेश समिती, पुणे, इ.११ वी केंद्रीय प्रवेश समिती सदस्य, सुकाणू समिती सदस्य, झोनप्रमुख, झोन सहाय्यक, पर्यवेक्षीय अधिकारी, पालक प्रतिनिधी उपस्थित होते.

दिनांक : ०२.०५.२०१५

(बाळासाहेब ओव्हाळ)
सहाय्यक शिक्षण संचालक,
पुणे विभाग, पुणे - १ तथा
सचिव,
इ.११ वी केंद्रीय प्रवेश समिती, पुणे